# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## ( आस्थापना विभाग )

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था/१६९ /२०१९ दि. ११/०१/२०१९

# परिपत्रक

विषय :- गोंडवाना विद्यापीठात १३ वा राज्यस्तरीय संशोधन महोत्सव 'अविष्कार-२०१८' तसेच "सहावा दीक्षांत समारंभ" आयोजनाच्या अनुषंगाने दिनांक १२/०१/२०१९ व दिनांक १३/०१/२०१९ रोजी नियमीत कार्यालयात सुरू असल्याबाबत.

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की,, १३ वा राज्यस्तरीय संशोधन महोत्सव **'अविष्कार - २०१८'** या महोत्सवाचे दिनांक १५ जानेवारी २०१९ ते १८ जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजन करण्यात येणार असुन 'अविष्कार - २०१८' या संशोधन महोत्सवाकरीता मुख्य अतिथी म्हणुन मा. श्री. के. एन. व्यास, Chairman, Atomic Energy Commission and Secretary, Department of Atomic Energy (Govt. of India) यांचे शुभ हस्ते उदघाटन सोहळा दिनांक १५ जानेवारी २०१९ रोजी दु. ३.०० वाजता पार पडणार असुन प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्री. पी. आर. पाटील, Associate Director, Reactor Design & Development Group Bhabha Atomic Research Center हे उपस्थित राहणार आहेत. तसेच अविष्कार - २०१८ चे दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० वा. समारोपीय कार्यक्रमाकरीता डॉ. व्ही. एम. भाले, मा. कुलगुरू, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तसेच विद्यापीठाचा **"सहावा दीक्षांत समारंभ"** शनिवार, दिनांक १९ जानेवारी २०१९ ला सकाळी ११.०० वाजता मा. कुलगुरू, डॉ. नामदेव व्ही. कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केलेला असुन सदर समारंभात मा. डॉ. के. व्ही. प्रभु, अध्यक्ष, वनस्पती प्रजाती आणि शेतकऱ्यांचे अधिकार संरक्षण प्राधिकरण, कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, हे प्रमुख अतिथी म्हणुन दीक्षांत भाषण करणार आहेत. तसेच मा. प्र-कुलगुरू, डॉ. चंद्रशेखर भुसारी, हे उपस्थित राहणार आहेत.

त्याअनुषंगाने १३ वा राज्यस्तरीय संशोधन महोत्सव **'अविष्कार - २०१८'** तसेच विद्यापीठाचा **"सहावा दीक्षांत समारंभ"** या दोन्ही कार्यक्रमाच्या पुर्वतयारी व इतर आवश्यक कार्यालयीन कामकाजाकरीता दिनांक १२ जानेवारी २०१९ व दिनांक १३ जानेवारी २०१९ रोजी विद्यापीठातील सर्व कार्यालये नियमीत सुरू राहतील, यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
**कुलसचिव**

प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषीत:-

१) मा. कुलगुरू चे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. प्राचार्य, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली